पुणे जिल्हा शिक्षण मंडळ

**मामासाहेब मोहोळ महाविद्यालय,पौड रोड,पुणे -३८**

**मराठी विभाग**

**अहवाल शै.वर्ष २०२४-२०२५**

सन २०२४-२०२५ मध्ये मराठी विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

१) ५ सप्टेंबर २०२४ रोजी महाविद्यालयात **शिक्षकदिन** साजरा करण्यात आला. शिक्षकदिनानिमित्त मराठी विभागातील अंजली तुसाम, तृतीय वर्ष कला व ज्ञानेश्वरी सणस , द्वितीय वर्ष वाणिज्य या विद्यार्थिनींनी शिक्षकाच्या भूमिकेतून अध्यापनाचा आनंद घेतला.

२) १५ ऑक्टोंबर २०२४ रोजी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त **"वाचन प्रेरणा दिन"** साजरा करण्यात आला.याप्रसंगी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. यादिवशी मराठी विभागाने आयोजित केलेल्या सामुहिक व सलग वाचनाच्या उपक्रमात सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला

३) ११ डिसेंबर २०२४ रोजी **"शांतता, पुणेकर वाचत आहे"** हा राष्ट्रीय पुस्तक न्यास आयोजित उपक्रम महाविद्यालयात राबविण्यात आला. या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी,प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तासभर आपल्या आवडीचे ग्रंथवाचन करून सहभाग नोंदविला.
मराठी विभागातील विद्यार्थ्यांची या उपक्रमांतर्गत फर्ग्युसन महाविद्यालय ,पुणे येथे पुस्तक प्रदर्शनानिमित्त **अभ्यास सहल** आयोजित करण्यात आली होती.

४) १ जानेवारी २०२५ रोजी **"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"** या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी सामुहिक ग्रंथवाचन करून वाचलेल्या पुस्तकाचे परीक्षण केले.

५) ३ जानेवारी २०२५ रोजी "वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत **लेखक-वाचक संवाद** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. "जोहार" कादंबरीचे लेखक प्रा. सुशील धसकटे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

६) ९ जानेवारी २०२५ रोजी "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" अंतर्गत मा.पल्लवी पाठक यांच्या **कथाकथनाचा** कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यादिवशी विद्यार्थ्यांच्या कथाकथन स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सूरज शिराळे,एमएस्सी

Scanned with OKEN Scanner

संगणकशास्त्र याने प्रथम क्रमांक , वैष्णवी वारे,द्वितीय वर्ष संगणकशास्त्र हिने द्वितीय क्रमांक आणि वैभवी कांबळे,प्रथम वर्ष कला हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

७) १४ ते १८ जानेवारी २०२५ या कालावधीत **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** अंतर्गत विभागातर्फे विविध स्पर्धा घेण्यात आल्या.या स्पर्धा व प्राविण्यप्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे-

**१ हस्ताक्षर स्पर्धा**

प्रथम क्रमांक -दिनेश रवींद्र सावंत (द्वितीय वर्ष कला)

द्वितीय क्रमांक - शुभांगी ज्ञानेश्वर मोरे (एम.कॉम, भाग १)

तृतीय क्रमांक - रोहिणी प्रभाकर जाधव (प्रथम वर्ष, बी.बी.ए.सी.ए.)

**२ काव्यलेखन स्पर्धा**

प्रथम क्रमांक - वैष्णवी कानिफनाथ वारे,(द्वितीय वर्ष, संगणकशास्त्र)

द्वितीय क्रमांक - श्रेया शरद जाधव (प्रथम वर्ष वाणिज्य )

**३ निबंध लेखन स्पर्धा**

प्रथम क्रमांक - चैताली सुनील ढोबळे ( प्रथम वर्ष कला)

दिनेश रवींद्र सावंत ( द्वितीय वर्ष कला )

द्वितीय क्रमांक - नम्रता रामदास भागवत ,(द्वितीय वर्ष, संगणकशास्त्र)

तृतीय क्रमांक - रुपेश रमेश मोडलकर ( द्वितीय वर्ष वाणिज्य)

८) मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे औचित्य साधून विद्यार्थी विकास मंडळ व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने **"साहित्याचे लेखन आणि सादरीकरण"** या विषयावर ३० व ३१ जानेवारी रोजी **दोन दिवसीय कार्यशाळा** आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ख्यातनाम अनुवादक व लेखिका डॉ.उमा कुलकर्णी यांनी अनुवाद लेखनाचे अनुभव विशद करत साहित्याच्या लेखनप्रक्रियेवर प्रकाश टाकला. कवी व पटकथाकार मा.गिरीश कोरवी यांनी रानटी या कथेचे व काही स्वलिखित कवितांचे सादरीकरण करून विद्यार्थ्यांना साहित्य सादरीकरणाची तंत्रे विशद केली. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी संहिता,संवाद लेखक व गीतकार विघ्नेश जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संहिता व संवाद लेखनाचे प्रात्यक्षिक देऊन विद्यार्थ्यांकडून त्यांनी संवाद लेखन करून घेतले.

कार्यशाळेसाठी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मा. विघ्नेश जोशी व उपप्राचार्य डॉ.मेघना भोसले यांच्या हस्ते सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात आले.

९) ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या **"विश्व मराठी साहित्य संमेलन"** कार्यक्रमास १ फेब्रुवारी रोजी मराठी विभागातील विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनी भेट दिली व संमेलनातील कार्यक्रम व पुस्तक प्रदर्शनाचा लाभ घेतला.

१०) २७ फेब्रुवारी हा दिवस ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त कविवर्य कुसुमाग्रज यांची जयंती व **जागतिक मराठी भाषा गौरव दिन " एक दिवस कवितांचा"** या उपक्रमाद्वारे साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थी,प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्वरचित आणि संकलित प्रेम कविता,निसर्ग कविता,सामाजिक कविता,जीवन चिंतन पर कविता ,स्त्रीजाणिवेच्या कविता अशा विविध कवितांचे सादरीकरण केले.

मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी २०२३-२०२४ मधील परीक्षांमध्ये लक्षणीय यश संपादन केले आहे.

तृतीय वर्ष मराठी निकाल :

१) प्रथम क्रमांक : श्रुतिका संजय भोयने- ६८.२५ %

२) द्वितीय क्रमांक : खेडेकर चैत्राली सुनील - ६६.२५%

३) तृतीय क्रमांक : अक्षय शिवाजी जोगदंड - ६३.३३%

एम.ए.,भाग २ निकाल :

१) प्रथम क्रमांक : श्रुती विघ्नेश जोशी - ८६.८८%

२) द्वितीय क्रमांक : विघ्नेश विनायक जोशी - ७४.७५%

३) तृतीय क्रमांक : दीपक मारोती गायवळे - ७०.१३%

*मराठी विभागप्रमुख प्रा.अपर्णा पांडे यांनी लायन्स इंटरनॅशनल ३४३२ डीर अंतर्गत अध्यक्षांच्या वक्तृत्व स्पर्धेत परीक्षक म्हणून काम पहिले.

*विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ.शोभा तितर यांचे प्रकाशित लेख :

१. स्त्री-साहित्याचा मागोवा ,खंड ५ (२०१० ते २०२०) मध्ये "नाटक आणि एकांकिका" या विषयावरील २१ पृष्ठांचे लेखन प्रसिद्ध.

२. लेखक,संपादक महावीर जोंधळे साहित्य विशेषांक, "सक्षम समीक्षा" या नियतकालिकात सन्माननीय महावीर जोंधळे यांच्या कवितांवर "सम्यक वाटेवरचा प्रवास" हा लेख प्रसिद्ध.

Scanned with OKEN Scanner

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनातून व मराठी विभागाच्या प्राध्यापक डॉ.शोभा तितर यांच्या सहकार्याने वरील कार्यक्रमांचे यशस्वी नियोजन विभागाने केले.

प्रा. अपर्णा पांडे

मराठी विभागप्रमुख

Scanned with OKEN Scanner